# प्रेसनोट दि. २२/०३/२०१९

## कोरेगावपार्क भागातील २ स्पावर छापा टाकुन थायलंड देशाच्या ५ महिलांची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.२१/०३/२०१९ रोजी श्री. भानुप्रताप बर्गे सहा पोलीस आयुक्त गुन्हे -२ यांना मिळालेल्या बातमी वरुन कोरेगाव पार्क मधील लेन नं -०७, पावर प्लाझा बिल्डींग, कोरेगाव पार्क पुणे येथील **सुकन्या स्पा** मध्ये छापा कारवाई करुन थायलंड देशाच्या ३ महिलांची वेश्या व्यवसायातुन सुटका करुन स्पामध्ये व्यवस्थापक म्हणुन काम करणारे व वेश्या व्यवसाय चालविण्यात मदत करणारे १) सागर कैलास परदेशी वय ३६ वर्षे, रा. संत गजानन महाराज नगर,सार्थक ब्लॉसम सोसायटी शेजारी, कोंढवा,बुद्र., पुणे ,२) केवीन सॅमसंग सनी, वय ३०, रा- बिल्डींन नं ०६, फ्लॅट नं ०५, जय सोसायटी, ३८४ भवानीपेठ, पुना कॉलेज जवळ, पुणे यांना रोख रक्कम,मोबाईल फोनसह ताब्यात घेवुन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. नमुद इसमांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये स्पा मालक राहुल राठोड हा सध्या थायलंड देशात वास्तव्यास राहुन परदेशातील मुलींना वेश्या व्यवसायात आणन्याचे काम करीत असल्याचे अटक केलेल्या आरोपीतांनी सांगितले आहे.

तसेच दिनांक २१/०३/२०१९ रोजी लेन नं. ०६ पॉवर पॉईन्ट बिल्डींग, पहीला मजला, इल्लुमी स्पा, कोरेगांव पार्क, पुणे येथे छापा कारवाई करुन स्पा मॅनेजर महेश नामदेव शिंदे, वय ३१ रा. भिमनगर, कोंढवा खुर्द, पुणे व २. स्पाचे मालक रितेश जोगिन, पुर्ण नाव पत्ता माहित नाही यांचे विरुध्द स्पाचे नावाखाली वेश्या व्यवसाय चालतवत असले बाबत कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन छापा कारवाई मधुन रोख रक्कम, मोबाईल फोन, पासपोर्ट, थायलंड देशाच्या २ मुलींची सुटका करण्यात आली आहे.

**इलुमी स्पा** मध्ये केलेल्या कारवाईचे वेळी स्पा मधील रिसेप्शन काऊंटरवर नागालँड व मेघालय मधील दोन मुली रिसेप्शनीस्ट म्हणुन मिळुन आल्या. त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी त्या कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे सांगुन पार्ट टाईम रिसेप्शनीस्ट म्हणुन काम करीत असल्याचे सांगितले. सदर मुलींना स्पा मध्ये अनैतिक गोष्टी चालत असल्याचे माहिती नव्हते.

याद्वारे नागरीकांना व बाहेरील राज्यातील आलेल्या विदयार्थ्याना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या स्पामध्ये नोकरी करु नये किंवा अनैतिक /अवैध्य काही नसल्याची खात्री करुनच नोकरी करावी.

वरील कारवाई श्री. भानुप्रताप बर्गे, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे, सौ मनिषा झेंडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सामाजिक सुरक्षा विभाग व गुन्हे शाखेचे सपोनि अश्वीनी जगताप, पो उप निरी योगिता कुदळे, कर्मचारी नामदेव शेलार, राजाराम घोगरे, प्रमोद म्हेत्रे, राजेंद्र कचरे, नितीन तेलंगे, सुनिल नाईक, तुषार आल्हाट, सचिन कदम, राजेंद्र ननावरे, निलेश पालवे, किरण अबदागिरे, प्रमोद माळी, जितेंद्र तुपे, विशाल शिर्के, सुधीर इंगळे, राहुल सकट, शंकर संपत्ते, अनुराधा धुमाळ, ननिता येळे, सुप्रिया शेवाळे हे कारवाईत सहभागी झाले होते.